# ९. १९४५ नंतरचे जग (I)

पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर (१९१९) पासून दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीचा (१९३९) काळ हा आंतरराष्ट्रीय संबंधात बदलाचा काळ होता. या काळात जगात शांतता व सुव्यवस्था स्थापन करण्यासाठी राष्ट्रसंघाची निर्मिती केली गेली; परंतु युरोपमधील संघर्ष संपले नाहीत आणि जगाने पुन्हा एकदा युद्ध अनुभवले.

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात अनेक बदल घडून आले. त्याचे आज देखील महत्त्व जाणवते. या बदलांनी महायुद्धोत्तर काळातील जागतिक व्यवस्थेचा पाया तयार केला. या काळात 'शीतयुद्धा'ची सुरुवात झाली. या प्रकरणात आपण १९४५ नंतरच्या घटनांचा आढावा घेणार आहोत.

## दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम

दोन्ही युद्धांदरम्यान जे बदल सुरू झाले होते त्यांना दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात निश्चित स्वरूप प्राप्त झाले. हे बदल खालीलप्रमाणे :

(i) **युरोपकेंद्रित राजकारणाचा शेवट :** एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकापर्यंतचा काळ हा युरोपकेंद्रित कालखंड मानला जातो. दुसऱ्या महायुद्धादरम्यान जर्मनी, फ्रान्स आणि इटली ही युरोपमधील महत्त्वाची राष्ट्रे पराभूत झाली होती. युनायटेड किंग्डम उद्ध्वस्त झाले होते. दुसरीकडे, अमेरिका आणि सोव्हिएट रशिया या बड्या सत्ता म्हणून उदयास आल्या. युरोपीय सत्तांचे महत्त्व कमी झाल्यामुळे आता जग हे युरोपकेंद्रित राहिले नाही. अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांचे महत्त्व वाढल्यामुळे युरोपीय राष्ट्रांचे महत्त्व कमी झाले.

(ii) **युरोपची विभागणी :** दुसऱ्या महायुद्धादरम्यान सोव्हिएट रशियाच्या सैन्याने पूर्व युरोपचा प्रदेश व्याप्त केला होता. पश्चिम युरोपवर अमेरिका, फ्रान्स व युनायटेड किंग्डम या पाश्चात्य राष्ट्रांनी ताबा मिळवला होता. जर्मनीच्या पराभवानंतर दोन्ही बाजूंना आपापल्या प्रदेशावर ताबा कायम ठेवायचा होता. म्हणूनच युद्ध संपले तेव्हा युरोपचे पूर्व आणि पश्चिम असे विभाजन झाले.

(iii) **विचारप्रणालीचे कार्य :** रशियातील १९१७ च्या बोल्शेविक क्रांतीने आंतरराष्ट्रीय संबंधात विचारप्रणाली हा एक नवीन घटक आणला होता. या क्रांतीनंतर सोव्हिएट रशियाची साम्यवादी राष्ट्र म्हणून निर्मिती झाली. सोव्हिएट रशियाच्या आधिपत्याखाली असलेल्या पूर्व युरोपीय राष्ट्रांनी साम्यवादी विचारप्रणाली मान्य केली तर अमेरिकेच्या प्रभावाखाली असलेल्या पश्चिम युरोपीय राष्ट्रांनी भांडवलशाही व्यवस्था मान्य केली. आता युरोपच्या विभागणीला विचारप्रणालीचे एक नवीन अंग प्राप्त झाले होते.

(iv) **संयुक्त राष्ट्रांची स्थापना :** १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रांची स्थापना ही एक महत्त्वाची घटना होती. शांतता व स्थैर्य राखण्यासाठी या आंतरराष्ट्रीय संघटनेची निर्मिती केली गेली होती. आता राष्ट्रसंघाच्या जागी संयुक्त राष्ट्रे हे कार्य करणार होते.

(v) **आशियाचा उदय :** या काळातील आणखी एक महत्त्वाचा प्रवाह म्हणजे आशिया व आफ्रिकेतील वसाहतवादविरोधी किंवा स्वातंत्र्याच्या लढ्यांचे यश. त्यातूनच पुढे आशिया व आफ्रिकेतील देश स्वतंत्र होऊ लागले.

**माहीत आहे का तुम्हांला?**

**संयुक्त राष्ट्रांच्या मुख्य शाखा :**

(i) **आमसभा :** आमसभा ही संयुक्त राष्ट्राची विचारविनिमय करणारी, धोरण निर्मिती करणारी, प्रातिनिधिक स्वरूपाची संघटना आहे. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेमध्ये सर्व सभासद राष्ट्रे प्रतिनिधी असतात.

(ii) **सुरक्षा परिषद :** आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्याची जबाबदारी मुख्यत्वेकरून सुरक्षा परिषदेची आहे. यामध्ये १५ सभासद राष्ट्रे असतात. (यांपैकी ५ कायम सदस्य राष्ट्रे आणि १० अस्थायी सदस्य राष्ट्रे आहेत.)

(iii) **आर्थिक आणि सामाजिक परिषद :** राष्ट्राराष्ट्रांत समन्वय साधणे, धोरणांचा आढावा घेणे, धोरणविषयक वैचारिक आदान-प्रदान, आर्थिक-सामाजिक व पर्यावरणीय समस्यांवर सूचना करणे, आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त विकासाच्या उद्दिष्टांची यशस्वी अंमलबजावणी करणे यासाठी मुख्यतः आर्थिक आणि सामाजिक परिषद जबाबदार आहे.

(iv) **विश्वस्त परिषद :** विश्वस्त परिषदेची स्थापना ११ विश्वस्त प्रदेशांवर आंतरराष्ट्रीय देखरेख ठेवण्यासाठी करण्यात आली. या विश्वस्त प्रदेशांना स्वशासनासाठी, सक्षम आणि स्वतंत्र होण्यासाठी विश्वस्त परिषदेने पुढाकार घेतला. १९९४ पर्यंत सर्व विश्वस्त प्रदेश स्वशासित आणि स्वतंत्र झाले. १ नोव्हेंबर १९९४ रोजी विश्वस्त परिषदेने आपले उद्‌दिष्ट साध्य करून, कामकाज संपुष्टात आणले.

(v) **आंतरराष्ट्रीय न्यायालय :** आंतरराष्ट्रीय न्यायालय ही संयुक्त राष्ट्राची न्यायालयीन शाखा आहे. त्याचे मुख्यालय पिस पॅलेस 'द हेग' (नेदरलँडस्) येथे आहे.

(vi) **सचिवालय :** सचिवालयात सरचिटणीस आणि कर्मचारी वर्ग दैनंदिन कामकाज पाहतात. सरचिटणीस हा संयुक्त राष्ट्रांच्या सचिवालयाचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी असतो. याची नेमणूक सुरक्षा परिषदेच्या शिफारशीवरून आमसभा पाच वर्षांसाठी करते.

**हे शोधा.**

(१) संयुक्त राष्ट्रांचे एकूण सभासद किती आहेत?
(२) सुरक्षा परिषदेचे कायम सदस्य देश कोणते आहेत?
(३) संयुक्त राष्ट्राचे मुख्य कार्यालय कोठे आहे?
(४) आतापर्यंत होऊन गेलेल्या सरचिटणिसांचे नाव व कालखंड यांची यादी करा.

**संयुक्त राष्ट्रांची भूमिका**

(i) **आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था राखणे :** १९४५ साली संयुक्त राष्ट्रे एका मध्यवर्ती ध्येयाने प्रेरित होऊन अस्तित्वात आली. ते ध्येय म्हणजे आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था राखणे, संघर्षाला पायबंद घालणे, संघर्षात सहभागी झालेल्या राष्ट्रांना शांतता प्रस्थापनेत मदत करणे, शांततामय परिस्थिती निर्माण व वृद्‌धिंगत करणे.

(ii) **मानवी हक्कांचे संरक्षण :** मानवी हक्कांचे संवर्धन आणि संरक्षण हा संयुक्त राष्ट्रांचा महत्वाचा उद्देश व मार्गदर्शक तत्व आहे. १९४८ साली संयुक्त राष्ट्राने मानवी हक्कांचा जाहीरनामा घोषित केला.

(iii) **मानवतावादी मदत पुरवणे :** आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवतावादी स्वरूपाच्या आंतरराष्ट्रीय समस्यांच्या सोडवणुकीसाठी आतंरराष्ट्रीय सहकार्य साध्य करणे हा संयुक्त राष्ट्रांचा महत्वाचा उद्देश आहे. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती काळात, मानवतावादी मदत कार्यात समन्वय साधण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदाय संयुक्त राष्ट्रांवर अवलंबून आहे.

(iv) **शाश्वत विकास संवर्धन :** विकासाची जागतिक संकल्पना काळानुरूप बदलली आहे. आर्थिक विकासाची संधी आणि समृद्धीचे जतन, व्यापक सामाजिक कल्याण आणि पर्यावरणाचे संरक्षण यांसारख्या शाश्वत विकासाच्या संवर्धनासाठी संयुक्त राष्ट्रे कटिबद्ध आहेत.

(v) **आंतरराष्ट्रीय कायद्याचे उन्नयन करणे :** आंतरराष्ट्रीय कायद्याचा विकास करणे व आदर राखणे हे संयुक्त राष्ट्रांचे महत्त्वाचे कार्य आहे. न्यायालय, लवाद, बहुस्तरीय करार व सुरक्षा परिषद यांमार्फत हे कार्य चालते.

**शोधा पाहू ?**

शांतता व सुरक्षा राखण्यासाठी संयुक्त राष्ट्रांची शांतिसेना महत्वाचे कार्य करते. भारताने संयुक्त राष्ट्रांच्या शांतिसेनेत भाग घेऊन कोणत्या देशांत सशस्त्र सेना पाठवली ?



**माहीत आहे का तुम्हांला ?**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझवेल्ट यांनी 'United Nations' हे नाव दिले. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान, १ जानेवारी १९४२ च्या संयुक्त राष्ट्राच्या जाहीरनाम्यात हे नाव पहिल्यांदा वापरले गेले. १९४५ साली सॅनफ्रान्सिस्को मध्ये ५० प्रतिनिधी राष्ट्रांची आंतरराष्ट्रीय संघटना संबंधीची परिषद झाली. त्यामध्ये संयुक्त राष्ट्राची सनद तयार करण्यात आली. भारत हा संयुक्त राष्ट्रांचा संस्थापक सदस्य होता. भारताने ऑक्टोबर १९४५ मध्ये सदस्यत्व घेतले.

### शीतयुद्ध

युरोपच्या पूर्व-पश्चिम विभागणीने अमेरिका व सोव्हिएट रशिया दरम्यान तणाव निर्माण झाला. या तणावातूनच पुढे शीतयुद्धाची सुरुवात झाली. अमेरिका व सोव्हिएट रशिया दरम्यान या संबंधांचे वर्णन करताना शीतयुद्ध हा शब्दप्रयोग वापरला जातो. या संघर्षाचे अनेक पैलू आहेत.

(i) **राजकीय :** आपल्या ताब्यात असलेल्या प्रदेशावर राजकीय प्रभाव ठेवण्यासाठी केलेले प्रयत्न हा पहिला पैलू होता. सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखाली पूर्व जर्मनी, पोलंड, चेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, रूमानिया, बल्गेरिया आणि अल्बानिया हे देश होते, तर नेदरलँड, डेन्मार्क, बेल्जियम, पश्चिम जर्मनी, फ्रान्स, इटली, स्पेन, ग्रीस आणि युनायटेड किंग्डम

हे अमेरिकेच्या प्रभावाखाली होते. अमेरिका व सोव्हिएट रशियादरम्यान संघर्ष होऊ नये म्हणून फिनलँडवर तटस्थता लादली गेली.


(ii) **विचारप्रणाली :** सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखाली पूर्व युरोपीय राष्ट्रांनी साम्यवादी व्यवस्था स्वीकारली व साम्यवादी सरकारे स्थापन केली. पश्चिम युरोपीय राष्ट्रांनी अमेरिकेच्या प्रभावाखाली भांडवलशाही व्यवस्था स्वीकारली व तेथे लोकशाही सरकारे स्थापन केली गेली.

(iii) **आर्थिक :** साम्यवादी सरकारे असलेल्या पूर्व युरोपीय राष्ट्रांनी साम्यवादी अर्थव्यवस्था स्वीकारली. याचाच अर्थ तिथे सरकारी उद्योगधंद्यांना महत्वाचे स्थान असणार होते, तर लोकशाही व्यवस्था असलेल्या पश्चिम युरोपीय राष्ट्रांनी भांडवलशाही अर्थव्यवस्था अमलात आणली. या राष्ट्रांमध्ये खासगी उद्योगधंद्यांना महत्त्व असणार होते.

(iv) **सुरक्षा :** राष्ट्रांची सुरक्षा राखण्यासाठी युरोपमध्ये लष्करी गट तयार केले गेले. पश्चिम युरोपला सोव्हिएट रशिया व पूर्व युरोप पासून असलेल्या धोक्यांपासून संरक्षण करण्यासाठी १९४९ मध्ये उत्तर अटलांटिक लष्करी गटाची (The North Atlantic Treaty Organisation-NATO) निर्मिती केली गेली. तसेच पश्चिम युरोपीय व

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**बर्लिनची विभागणी :** दुसरे महायुद्ध संपले तेव्हा पूर्व जर्मनीवर सोव्हिएट रशियाचा तर पश्चिम जर्मनीवर अमेरिका, युनायटेड किंग्डम आणि फ्रान्सचा ताबा होता. याला जर्मनीचे विभाजन म्हणतात. जर्मनीची राजधानी असलेल्या बर्लिन शहराची देखील पूर्व आणि पश्चिम अशी विभागणी झाली होती. पूर्व बर्लिनवर सोव्हिएट रशियाची सत्ता होती, तर पश्चिम बर्लिनवर अमेरिका, युनायटेड किंग्डम व फ्रान्सची सत्ता होती. बर्लिन शहर हे पूर्व जर्मनीच्या प्रदेशात आहे. त्यामुळे पश्चिम बर्लिनचा प्रदेश सर्व बाजूंनी पूर्व जर्मनीने व्याप्त केला आहे.




बर्लिनचे भौगोलिक स्थान दाखवणारा नकाशा

अमेरिकेपासूनच्या संभाव्य धोक्यांना सामोरे जाण्यासाठी १९५५ मध्ये वॉर्सा करार केला गेला.

अमेरिका व सोव्हिएट रशिया दरम्यान प्रत्यक्ष युद्ध नसले तरी सतत तणाव होते. या परिस्थितीचे वर्णन करताना 'शीतयुद्ध' हा शब्दप्रयोग वापरला जातो. त्यात तणाव आहेत, परंतु प्रत्यक्ष युद्ध नाही. मात्र दोन्ही प्रतिस्पर्धी संभाव्य युद्धाच्या तयारीत होते.


आता आपण १९४५ नंतरच्या महत्त्वाच्या घटना आणि प्रवाहांचा अभ्यास करणार आहोत.

### शीतयुद्धाचे कालखंड


**कालखंड १९४५ ते १९४९-५० (सुरुवातीचा काळ) :** या सुरुवातीच्या काळात शीतयुद्धाला निश्चित स्वरूप प्राप्त होते. या काळात राजकीय, विचारप्रणाली, आर्थिक व लष्करी पैलूंवर युरोपची विभागणी केली गेली. त्यात राजकीय पैलू हा युरोपच्या विभाजनाचा होता; विचारप्रणाली ही राष्ट्रांच्या ध्येयांबाबत आणि आकांक्षांबाबत होती; आर्थिक विभाजन अर्थव्यवस्थेबाबत होते आणि लष्करी घटक हा लष्करी गटांबाबत होता. या दोन गटांतील विभागणीला पूर्व-पश्चिम विभागणी असेही म्हटले जाते. सोव्हिएट रशिया आणि पूर्व युरोपचा उल्लेख पूर्व म्हणून तर अमेरिका आणि पश्चिम युरोपीयन राष्ट्रांचा उल्लेख पश्चिम म्हणून केला जातो.

**माहीत आहे का तुम्हांला?**

**पोलादी पडदा :** ब्रिटनचे माजी प्रधानमंत्री विन्स्टन चर्चिल यांनी १९४६ मध्ये अमेरिकेत फुल्टन येथील वेस्टमिनिस्टर महाविद्यालयातील भाषणात युरोपमधील परिस्थितीचे वर्णन केले. ते म्हणाले, ''बाल्टिकमधील स्टेटीनपासून ॲड्रिॲटिकमधील ट्रिस्टपर्यंत युरोप खंडात एक पोलादी पडदा पडला आहे.'' हे भाषण युरोपची पूर्व-पश्चिम विभागणी दर्शवणारे पहिले वक्तव्य होते.




दुसऱ्या महायुद्धानंतरचे युरोपचे विभाजन




लष्करी गट : नाटो आणि वॉर्सा करार

> **शोधा पाहू !**
>
> नाटोची सभासद राष्ट्रे कोणती आहेत?

याच दरम्यान आशियात काही महत्त्वाच्या घटना घडल्या.

(i) १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. आशियातील वसाहतवादाविरोधी चळवळीचे हे यश होते.

(ii) १९४९ मध्ये माओ झेडाँग यांच्या नेतृत्वाखाली चीन कम्युनिस्ट राष्ट्र झाले. १९५० मध्ये चीनने सोव्हिएट रशियाबरोबर लष्करी करार केला.

**कालखंड १९४९-५० ते १९५९ (आशियामधील शीतयुद्ध) :** चीनमध्ये साम्यवादी सरकार आल्यानंतर आशियात बदल होऊ लागले. १९५० मध्ये कोरियात युद्ध सुरू झाले. उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर आक्रमण केल्याने युद्ध सुरू झाले. दक्षिण कोरियाने संयुक्त राष्ट्रांकडे मदत मागितली. संयुक्त राष्ट्रांनी दक्षिण कोरियाच्या संरक्षणाकरिता सैन्य पाठवले. कोरियन युद्ध १९५० पासून १९५३ पर्यंत चालले आणि कोरियाची उत्तर व दक्षिण अशी विभागणी होऊन युद्ध थांबले.

> **शोधा पाहू !**
>
> कोरियन युद्धात भारताने सहभाग घेतला होता का? भारताचा सहभाग कशा स्वरूपात होता?

आशियात अनेक लष्करी गट तयार झाले. हे गट पुढीलप्रमाणे :

— ANZUS (1952) : ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, अमेरिका

— SEATO (South East Asia Treaty Organisation) (1954) : थायलंड,

फिलीपाईन्स, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, फ्रान्स, युनायटेड किंग्डम, अमेरिका

— CENTO (Central Treaty Organisation) (1955) : तुर्कस्तान, इराक (१९५८ मध्ये सदस्यत्व सोडले), इराण (१९७९ मध्ये सदस्यत्व सोडले), पाकिस्तान

— सोव्हिएट रशिया आणि चीन सुरक्षा करार (१९५०)

— युरोपमध्ये वॉर्सा करारामुळे (१९५५) वॉर्सा गट निर्माण झाला. त्यात अल्बानिया (१९६८ मध्ये सदस्यत्व सोडले), बल्गेरिया, चेकोस्लोव्हाकिया, पूर्व जर्मनी, हंगेरी, पोलंड आणि रूमानिया

१९५० च्या दशकात सोव्हिएट रशियात देखील बदल झाले. १९५३ मध्ये जोसेफ स्टॅलिनच्या मृत्यूनंतर निकिता क्रुश्चेव्ह सत्तेवर आले. क्रुश्चेव्ह यांनी सोव्हिएट रशियाच्या धोरणात बदल घडवून आणले. त्यांनी 'शांततामय सहजीवना'च्या धोरणाची संकल्पना मांडली. सोव्हिएट साम्यवादी व्यवस्था आणि अमेरिकन भांडवलशाही व्यवस्था या दोन्हींना शांततेत नांदावे लागेल असे ते सांगत होते. सहजीवनाला पर्याय नव्हता. कारण जर दोघांमध्ये आण्विक युद्ध झाले तर ते संहारक असेल, याची जाणीव त्यांना होती.

या कालखंडातील आणखी एक प्रवाह हा आशिया व आफ्रिकेतील प्रादेशिकतावाद हा होता. १९४७ मध्ये भारताने पहिली आशियाई परिषद घेतली. आशियातील स्वातंत्र्यलढ्याचे नेते या परिषदेत सहभागी झाले होते. आशियातील २५ राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी त्यात भाग घेतला. या परिषदेची पुढील उद्दिष्टे होती. (i) आशियातील सामान्य जनतेच्या समान प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी हे नेते एका व्यासपीठावर आले होते. (ii) आशियाई देशातील सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक समस्यांवर लक्ष वेधण्याची गरज होती. (iii) एकमेकांशी परस्पर संबंध प्रस्थापित करून संपर्क आणि सामंजस्य वाढवणे. ही परिषद म्हणजे आशियाई प्रादेशिकतावादाची सुरुवात मानली जाते.

**माहीत आहे का तुम्हांला?**

**प्रादेशिकतावाद म्हणजे काय?**


एखाद्या भौगोलिक क्षेत्रातील राष्ट्र प्रादेशिक संघटना तयार करतात. आपले राष्ट्रहित एकत्रितपणे साध्य करण्यासाठी हे गट तयार केले जातात. हे गट स्वतःची स्वतंत्र अस्मिता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. प्रादेशिक पातळीवरील या सहकार्याला प्रादेशिकतावाद म्हणतात. भौगोलिक जवळीक जशी महत्त्वाची असते तसेच काही निश्चित कार्यासाठी देखील गट तयार होतात. त्यामध्ये दळणवळण, ऊर्जा, आरोग्य यांसारखी कार्य असू शकतात. प्रादेशिकतावादाची सुरुवात आपापसातील राजकीय संवादातून होते. या संवादातून एखादी संघटना तयार होऊ शकते. युरोपियन युनियन (EU), ASEAN (Association of South East Asian Nations) किंवा सार्क (South Asian Association for Regional Cooperation, SAARC) ही काही उदाहरणे आहेत.

या परिषदेनंतर १९५५ मध्ये इंडोनेशियात बांडुंग येथे परिषद घेतली गेली. प्रादेशिकतावादाला अधिक व्यापक करण्यासाठी आफ्रिकेला समाविष्ट करून बांडुंग येथे पहिली आशियाई-आफ्रिकी परिषद घेतली गेली. बर्मा (आता म्यानमार), सीलोन (आता श्रीलंका), भारत, इंडोनेशिया आणि पाकिस्तान यांनी

पुरस्कृत केलेल्या या परिषदेत यांच्या व्यतिरिक्त इतर २४ राष्ट्रे सहभागी होती.



आशियाई परिषदेचे ठिकाण, दिल्ली



आशियाई परिषदेत पंडित जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी आणि खान अब्दुल गफार खान

या परिषदेचे मुख्य हेतू पुढीलप्रमाणे होते–

(i) सद्‌भावना व सहकार्याला प्रोत्साहन देणे.

(ii) आशिया व आफ्रिकेतील जनतेच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रश्नांची चर्चा करणे.

(iii) आशिया आणि आफ्रिकेचे जागतिक स्थान काय आहे हे पाहून जागतिक शांततेसाठी काय प्रयत्न करता येईल ते बघणे.

बांडुंग परिषद ही ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची होती. आशिया व आफ्रिकेत प्रादेशिकतावाद पसरवण्याची त्याने कामगिरी केली होती.



आफ्रो–आशियाई परिषदेचे ठिकाण, बांडुंग

प्रादेशिकतावादाने पश्चिम युरोपमध्ये वेगळे स्वरूप घेतले. तेथे आर्थिक सहकार्य हा प्रादेशिकतावादाचा पाया होता. १९५१ मध्ये युरोपीय कोळसा व पोलाद समूहाच्या निर्मितीपासून त्याची सुरुवात होते.

युरोपीय राष्ट्रांना आर्थिक व राजकीय व्यवस्था आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी युरोपियन युनियनची निर्मिती झाली. युरोपियन संसद आणि युरोपियन कम्युनिटीची निर्मिती करून प्रादेशिक एकात्मतेच्या दिशेने युरोपियन राष्ट्रांनी पावले उचलली.

**माहीत आहे का तुम्हांला?**

आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये जेव्हा राज्याचे प्रमुख अथवा शासनाचे प्रमुख त्यांच्या देशातील समस्यांवर चर्चा करण्यासाठी भेटतात तेव्हा अशा भेटीसाठी 'शिखर परिषद' हा शब्दप्रयोग वापरला जातो.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर आणि सोव्हिएट रशियाचे प्रधानमंत्री निकिता क्रुश्चेव्ह यांची १९५९ मध्ये कॅम्प डेव्हिड येथे भेट झाली. अमेरिका व सोव्हिएट रशिया यांमधील हा संवादाचा पहिलाच




कॅम्प डेव्हिड (१९५९) येथे राष्ट्राध्यक्ष ड्वाईट आयसेनहॉवर आणि प्रधानमंत्री निकीता क्रुश्चेव्ह

प्रामाणिक प्रयत्न होता. म्हणूनच शीतयुद्धाच्या इतिहासात ही भेट महत्त्वाची होती.

१९५९ नंतर काय बदल झाले हे आपण पुढच्या प्रकरणात पाहू.

**Please see the following websites for further information:**

**(1) World After World War II**

COEP History Club COEP (College of Engineering Pune) History Club arranged the last lecture of its eighth lecture series on the topic of "World After World War II".
https://www.youtube.com/results?search_query=shrikant+paranjpeThe World after World War II (in Marathi)

**(2) UN Peacekeeping**

UN Peacekeeping is the largest and most visible representation of the United Nations. It is a collective investment in global peace, security, and stability.
https://peacekeeping.un.org/en/india

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. १९४९ मध्ये .......... यांच्या नेतृत्वाखाली चीन कम्युनिस्ट राष्ट्र झाले.
(क्रुश्चेव्ह, माओ झेडाँग, जोसेफ स्टॅलिन, हो चि मिन्ह)

२. शांततामय सहजीवनाची संकल्पना .......... यांनी मांडली.
(आयसेनहॉवर, जोसेफ स्टॅलिन, क्रुश्चेव्ह, जवाहरलाल नेहरू)

**(ब) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१. युरोपीय सत्तांच्या वर्चस्वाचा काळ–


२. अमेरिका-सोव्हिएट रशिया दरम्यान तणाव–

**(क) गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. हंगेरी, रूमानिया, बल्गेरिया, फ्रान्स

२. इटली, पोलंड, स्पेन, ग्रीस

**प्र.२ (अ) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**



**(ब) दुसऱ्या महायुद्धानंतरचे युरोपचे विभाजन या नकाशाचे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. पूर्व युरोपातील सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखालील दोन देशांची नावे लिहा.

२. पश्चिम युरोपातील अमेरिकेच्या प्रभावाखालील दोन देशांची नावे लिहा.

**प्र.३ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

१. बोल्शेविक क्रांतीनंतर सोव्हिएट रशियाची भांडवलशाही राष्ट्र म्हणून निर्मिती झाली.

२. बांडुंग परिषदेने आशिया खंडात शीतयुद्ध आणले.

**प्र.४ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. प्रादेशिकतावाद ही संकल्पना स्पष्ट करा.

२. संयुक्त राष्ट्रांच्या भूमिकेबाबत चर्चा करा.

**प्र.५ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

शीतयुद्धाचे पैलू विशद करा.

(अ) राजकीय (ब) विचारप्रणाली

(क) आर्थिक (ड) सुरक्षा


**उपक्रम**

जगातील विविध प्रादेशिक संघटनांची यादी करा.

***

# १०. १९४५ नंतरचे जग (II)

मागील प्रकरणात आपण १९४५ नंतर झालेले बदल अभ्यासले. युरोपात शीतयुद्धाला कशी सुरुवात झाली व आशिया खंडातील बदल पाहिले. आता आपण १९५९ नंतर झालेले बदल अभ्यासू.




अमेरिका आणि क्युबाचे भौगोलिक स्थान

### कालखंड १९५९ ते १९६२ (शीतयुद्धातील बदलांचा काळ)

कॅम्प डेव्हिड शिखर परिषदेनंतर शीतयुद्धात एका नव्या युगाला सुरुवात झाली. या भेटीमुळे शीतयुद्धातील दोन विरोधकांमध्ये एकमेकांबद्दल सद्भावना निर्माण होणे अपेक्षित होते, परंतु अमेरिका व सोव्हिएट रशिया या देशांमध्ये तणाव उत्तरोत्तर वाढतच गेला. १९६१ मध्ये सोव्हिएट रशियाने बर्लिनची भिंत उभारायला सुरुवात केली. या भिंतीमुळे पश्चिम बर्लिन हे शहर उर्वरित देशांपासून अक्षरशः तुटले. लोक पूर्व आणि पश्चिम बर्लिनमधून प्रवास करू शकत नव्हते. कुटुंबे आणि मित्रपरिवार एकमेकांपासून विलग झाले.



बर्लिनची भिंत

१९६२ मध्ये क्युबा क्षेपणास्त्र पेचप्रसंग उद्भवला. ही घटना शीतयुद्धाच्या काळातील सर्वांत महत्त्वाच्या घटनांपैकी एक होती. सोव्हिएट रशियाने क्युबामध्ये क्षेपणास्त्र तैनात केली. ज्यामुळे अमेरिकेला थेट धोका निर्माण झाला. उत्तरादाखल अमेरिकेने क्युबाची सागरी नाकेबंदी केली. शीतयुद्धातील प्रतिस्पर्धी अशा प्रकारे प्रथमच एकमेकांसमोर उभे ठाकले. १९४५ नंतर पहिल्यांदाच अमेरिका आणि सोव्हिएट रशियाचे नौदल समोरासमोर आले आणि युद्धाची शक्यता बळावली. असे युद्ध झालेच तर ते अणुयुद्ध ठरेल, ही भीती निर्माण झाली होती. त्यामुळे या दोन देशांवर तणाव कमी करण्यासाठी दबाव टाकण्यात आला. सोव्हिएट रशियाने क्युबातून क्षेपणास्त्र काढून घेतल्यावर परिस्थिती निवळायला सुरुवात झाली.

**सागरी नाकेबंदी म्हणजे काय?**

सागरी नाकेबंदी म्हणजे जहाजांना बंदरात अथवा देशात प्रवेश करण्यास रोखणे. हे नौदलाच्या साहाय्याने केले जाते. अमेरिकेच्या नौदलाने क्युबा या बेटाच्या भोवताली नाकेबंदी केली; जेणेकरून कोणतेही आक्षेपार्ह शस्त्र क्युबात जाणार नाही.

१९६० च्या दशकात तिसऱ्या जगात अनेक महत्वाच्या घडामोडी घडल्या. १९६१ साली पहिली अलिप्ततावादी परिषद बेलग्रेड येथे भरवण्यात आली. अलिप्ततेची संकल्पना दोन महत्त्वाच्या तत्त्वांवर आधारलेली आहे : जागतिक घडामोडींबाबत स्वतंत्र दृष्टिकोन आणि शांततेचा दृष्टिकोन. म्हणूनच अलिप्ततावादी देशांनी शीतयुद्ध काळातील युतींपासून स्वतःला लांब ठेवले. कालानुरूप जेव्हा नवीन देश स्वतंत्र होऊन अलिप्ततावाद स्वीकारू लागले तेव्हा अलिप्ततावाद ही एक चळवळ म्हणून उभी राहिली. अलिप्तता म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणात राज्यांनी अक्रियाशील व तटस्थ राहावे असे नव्हे. उलटपक्षी, शांतता आणि विकासाचे संवर्धन करण्यासाठी राज्यांनी जागतिक घडामोडींत सहभाग नोंदवणे अपेक्षित आहे.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतील देशांसाठी एकत्रितपणे वापरली जाणारी संकल्पना म्हणजे '**तिसरे जग**'. यातील बरेचसे देश पूर्वी वसाहती होत्या. या देशांचे वर्णन विकसनशील, कमी विकसित किंवा किमान विकसित देश असे देखील केले जाते. याची महत्वाची कारणे म्हणजे औद्योगिकीकरणाचा हळुवार वेग, साक्षरतेचे प्रमाण कमी असणे आणि लोकसंख्येचे प्रमाण जास्त असणे. अशा अनेक देशांनी अलिप्ततावादी चळवळीत सहभाग घेतला. शीतयुद्धाच्या काळात, पाश्चिमात्य भांडवलशाही अर्थव्यवस्था असलेल्या देशांनी अमेरिकेसोबत युती केली. त्यांना 'पहिले जग' असे संबोधले गेले. पूर्वेकडील साम्यवादी अर्थव्यवस्था असणाऱ्या देशांनी सोव्हिएट रशियासोबत युती केली यांना 'दुसरे जग' म्हटले गेले.

भारताचे जवाहरलाल नेहरू, इजिप्तचे गमाल अब्दुल नासेर, घानाचे क्वामे नक्रुमा, इंडोनेशियाचे सुकार्नो, युगोस्लाव्हियाचे जोसिफ ब्रॉझ टिटो हे अलिप्ततावादी चळवळीचे संस्थापक होते.



अलिप्ततावादी चळवळीचे संस्थापक (डावीकडून) पंडित जवाहरलाल नेहरू, क्वामे नक्रुमा, गमाल अब्दुल नासेर, सुकार्नो, जोसिफ टिटो

गेल्या ५० वर्षांत अलिप्ततावादी चळवळ वाढली. या चळवळीने विकसनशील देशांना आर्थिक व राजकीय हक्क मिळवून देण्यास मदत केली. आज ही चळवळ अनेक आव्हानांना तोंड देत आहे. यामध्ये अतिसंहारक शस्त्रांचे निर्मूलन, दहशतवादाविरोधात लढा देणे, मानवी हक्कांचे रक्षण, संयुक्त राष्ट्रांना अधिक परिणामकारक करण्यासाठी प्रयत्नशील राहणे इत्यादींसारख्या आव्हानांचा समावेश होतो.

पहिल्या बेलग्रेड परिषदेपासून चळवळीच्या नियमितपणे शिखर बैठका होत असतात. बेलग्रेड येथे १९६१ साली २५ सदस्यांसोबत या चळवळीला सुरुवात झाली. आज सदस्यसंख्या १२० वर जाऊन पोहचली आहे.

**शोधा पाहू !**

१९६१ पासून झालेल्या सर्व अलिप्ततावादी परिषदांची यादी करा. ही संमेलने कधी आणि कोठे झाली तसेच संमेलनात कोणते महत्वाचे विषय चर्चिले गेले, ते लिहा.

**कोणत्या देशांना अलिप्ततावादी देश म्हणून मान्यता मिळू शकते?**

१९६१ सालच्या बेलग्रेड परिषदेत पुढील निकषांना मान्यता मिळाली.

(i) असा देश ज्याने वेगळ्या राजकीय व सामाजिक यंत्रणेसह राज्याच्या सहअस्तित्वावर आधारित स्वतंत्र धोरण अवलंबले असेल.

(ii) राष्ट्रीय स्वातंत्र्यचळवळींना पाठिंबा देणारा देश.

(iii) शीतयुद्धाच्या संदर्भात कोणत्याही बहुपक्षीय करारात सदस्य नसणारा देश.

(iv) महासत्तावादाशी निगडित कोणताही द्विपक्षीय लष्करी करार अथवा प्रादेशिक संरक्षण करार न केलेला देश.

(v) लष्करी तळ कोणत्याही विदेशी सत्तेच्या विशेषतः महासत्तेच्या प्रतिस्पर्धी देशांच्या हाती न देणारा देश.

## कालखंड १९६२ ते १९७२ (देतांतचा पाया)

क्युबातील क्षेपणास्त्र पेचप्रसंगाचा शीतयुद्धाच्या धुमश्चक्रीत प्रचंड परिणाम झाला. या पेचप्रसंगामुळे दोन अण्वस्त्रधारी राष्ट्रे समोरासमोर उभे ठाकण्याची शक्यता वाढली आणि तणाव कमी करण्याची गरज प्रकर्षाने भासू लागली. अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांनी द्विपक्षीय कराराद्वारे तणाव कमी करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. दोन राष्ट्रांना एकमेकांशी थेट संवाद साधता यावा यासाठी दूरध्वनीची 'हॉटलाईन' तयार करण्यात आली.

अण्वस्त्र कमी करण्यासाठी अनेक करार देखील केले गेले.

१९७२ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन आणि सोव्हिएट रशियामधील साम्यवादी पक्षाचे जनरल सेक्रेटरी लिओनिड ब्रेझनेव्ह मॉस्कोमध्ये भेटले. दोन्ही राष्ट्रांतील तणाव कमी करण्याच्या प्रक्रियेची सुरुवात या महत्त्वाच्या भेटीने झाली. या भेटीदरम्यान आण्विक क्षेपणास्त्रांच्या संख्येवर मर्यादा घालण्यासाठी दोन्ही राष्ट्रांनी करार केले. १९७२ च्या मॉस्को शिखर संमेलनाने तणाव शिथिलन (देतांत) पर्वाला सुरुवात झाली. 'देतांत' म्हणजे ताणतणाव कमी करण्याची प्रक्रिया. अमेरिका व सोव्हिएट रशियाने परस्परांमधील ताण-तणाव कमी करण्याचे प्रयत्न सुरू केले.



१९७२ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन आणि सोव्हिएट रशियामधील साम्यवादी पक्षाचे जनरल सेक्रेटरी लिओनिड ब्रेझनेव्ह मॉस्कोमध्ये भेटले.

**शोधा पाहू ?**

भारत आणि पाकिस्तानातील नेत्यांमध्ये शिखर संमेलने गेल्या काही वर्षांत कधी झाली ते शोधा. कोणत्या नेत्यांनी यात सहभाग नोंदवला होता? ही संमेलने कधी व कोठे झाली ?

या काळात घडलेली अजून एक महत्त्वाची घटना म्हणजे अमेरिका आणि चीन यांच्यातील सुधारलेले संबंध. १९४९ साली झालेल्या चिनी राज्यक्रांतीपासून अमेरिकेने चीनच्या साम्यवादी शासनाला मान्यता दिली नव्हती. १९७२ मध्ये अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी चीनला भेट दिली. चीनला भेट दिल्यामुळे १९७२ मध्ये अमेरिकेने चीनच्या साम्यवादी शासनाला मान्यता दिली. चीनने साम्यवाद स्वीकारल्यानंतर अमेरिकन अध्यक्षांमार्फत दिली गेलेली ही पहिलीच भेट होती.



चेअरमन माओ झेडाँग आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन (१९७२)

## कालखंड १९७२ ते १९७९ (देतांतचे पर्व)

देतांत म्हणजे मैत्री नव्हे. ही केवळ ताण कमी करण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेला हळूहळू सुरुवात झाली. अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांनी तणाव कमी करण्यासाठी बरेच पुढाकार घेतले. यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो :

(i) १९७३ साली पॅरिस येथे परिषद घेऊन व्हिएतनाम युद्ध थांबवण्याचे प्रयत्न करण्यात आले.

(ii) १९७५ साली आयोजलेले 'अपोलो सोयुझ' संयुक्त अंतरिक्ष उड्डाण करण्यात आले.

(iii) पूर्व आणि पश्चिम युरोपियन देशांमधील तणाव कमी करण्यासाठी संरक्षण या विषयावर युरोपमध्ये हेलसिंकी परिषद (१९७५) घेण्यात आली. (अमेरिका आणि सोव्हिएट रशिया सोबतच एकूण ३५ युरोपियन राष्ट्रांनी या परिषदेत सहभाग नोंदवला होता.)

(iv) अरब-इस्राएल वाद सोडवण्यासाठी अमेरिकेने १९७८ मध्ये कॅम्प डेव्हिड येथे परिषद आयोजित केली. अमेरिकन अध्यक्ष जिमी कार्टर, इजिप्तचे अध्यक्ष अन्वर अल-सदात, आणि इस्राएलचे प्रधानमंत्री मेनॅकन बेगिन यांनी 'मध्य पूर्वेतील देशांसाठी शांततेच्या संरचनेवर' स्वाक्षरी केली. या परिषदेमार्फत इस्राएल आणि अरब जगातील तणाव कमी करण्याचे प्रयत्न करण्यात आले.




'अपोलो सोयुझ' संयुक्त उड्डाण साजरे करणारे पोस्टाचे तिकीट

या कालखंडात इतरही अनेक महत्वाचे बदल पाहायला मिळाले. या बदलांना आर्थिक महत्त्व होते.

- १९७३ मध्ये अरब-इस्राएल युद्ध झाले. इस्राएलवर दबाव टाकण्यासाठी अरब राष्ट्रांनी तेलाचे उत्पादन कमी करण्याचे ठरवले. परिणामतः तेलाची किंमत अचानक वाढली. हे सर्व पेट्रोलियम निर्यातदार देशांची संघटना (OPEC) या संस्थेमार्फत करण्यात आले. यामुळे संपूर्ण जगातील तेलाच्या किमतीत वाढ झाली.
- अजून एक घटना म्हणजे अलिप्ततावादी देशांनी घेतलेला पुढाकार. अलिप्ततावादी गटाने 'नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थे'ची मागणी केली. गरीब देशांना जागतिक आर्थिक निर्णय प्रक्रियेत सहभाग घेता यावा हा या मागणीमागचा उद्देश होता; कारण या निर्णय प्रक्रियेवर कायम श्रीमंत देशांचे वर्चस्व राहिले आहे.

या कालखंडात आंतरराष्ट्रीय संबंधात आर्थिक समस्यांना मिळणारे वाढते महत्व पाहायला मिळाले. एकीकडे, अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्यातील राजकीय वाद निवळत होते. दुसरीकडे तिसरे जग मागण्या मांडताना अधिक सक्रिय झालेले पाहायला मिळत होते. याच कालखंडात नवीन परिभाषा वापरायला सुरुवात झाली. जगाचे विभाजन करताना

आता, ते उत्तर-दक्षिण विभाजन असे रेखाटले गेले. उत्तर गोलार्धातील श्रीमंत देशांची गणती उत्तर विभाजनात केली गेली. (जसे, की सोव्हिएट रशिया, युरोप आणि उत्तर अमेरिका). दक्षिण गोलार्धातील गरीब देशांची गणती दक्षिण विभाजनात केली गेली. (आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतील देश)

हा कालखंड आर्थिक परस्परावलंबनाचा देखील होता. येथे मुख्यतः आर्थिक समस्यांबाबतीत समन्वय साधला गेला. आर्थिक समन्वयासाठी संघटना निर्मितीचा टप्पा म्हणून याकडे आपणांस पाहता येऊ शकते. समन्वयाचा हेतू साध्य करण्यासाठी आर्थिक संघटनांनी व्यापारावर लक्ष केंद्रित केले. सीमा शुल्कांसारखे व्यापारी अडथळे काढून टाकण्याचा या मागील विचार होता. वस्तूंच्या अनिर्बंधित व्यापारामुळे लोकांमध्ये एकमेकांप्रति सद्भावना व समन्वयाची भावना जागृत होईल. 'मुक्त व्यापाराच्या' करारांना मान्यता देऊन हे केले गेले. या संघटनांना 'व्यापारी गट' असे देखील म्हटले जाते. उदा., दक्षिण-पूर्व आशियाई देशांची संघटना (ASEAN) आणि युरोपियन युनियन. या दोन्ही प्रादेशिक संघटनांनी 'मुक्त व्यापाराचे' करार केले आहेत. व्यापार गट म्हणून नाफ्टा (North American Free Trade Agreement-NAFTA) ची स्थापना करण्यात आली. यात कॅनडा, अमेरिका आणि मेक्सिको या देशांचा समावेश होता.

**व्यापार गट म्हणजे काय?**

जेव्हा राष्ट्र त्यांचे आर्थिक संबंध विशेष करारामार्फत जपतात तेव्हा व्यापारी गट निर्माण होतात. हे करार सामान्यतः व्यापारातील अडथळे कमी करणे अथवा काढून टाकणे यावर केंद्रित असतात. सर्वत्र आढळणारे व्यापारी अडथळे म्हणजे जकात (आयातीवरील कर) आणि कोटा (आयातीच्या प्रमाणावर निर्बंध).

याशिवाय अशा काही प्रादेशिक संघटना आहेत ज्यांची निर्मिती संवादाला उत्तेजन देण्याच्या आणि दृढ प्रादेशिक वातावरण निर्मितीसाठी करण्यात आली आहे. आर्थिक व व्यापारविषयक समन्वयाला उत्तेजन देण्यासाठी संघटनांची निर्मिती झाली आहे. उदा., दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार संघटना (SAARC), अमेरिकन स्टेट्स संघटना (OAS), आफ्रिकन युनियन (AU).

**दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार संघटना - सार्क (SAARC)**

दक्षिण आशियाई प्रादेशिक संघटनेची स्थापना १९८५ मध्ये झाली. सार्कमध्ये एकूण ८ सदस्यराष्ट्रे आहेत. अफगाणिस्तान, बांग्लादेश, भूटान, भारत, मालदीव, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंका. सार्कचे मुख्यालय काठमांडू येथे आहे.

सार्कची उद्दिष्टे :

(i) दक्षिण आशियातील लोकांचे कल्याण करणे आणि त्यांच्या जीवनमानाचा स्तर उंचावणे.

(ii) त्या भागातील आर्थिक प्रगतीची गती वाढवणे, सामाजिक प्रगती व सांस्कृतिक विकास साधणे.

(iii) एकमेकांप्रति विश्वास वाढीस लागेल तसेच परस्परांच्या समस्या समजून घेण्याचा प्रयत्न करणे.

(iv) आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक आणि वैज्ञानिक क्षेत्रांत सक्रिय सहयोग आणि परस्पर साहाय्याचे संवर्धन करणे तसेच इतर विकसनशील देशांसोबतचे सहकार्य दृढ करणे.

### कालखंड १९७९ ते १९८५-८६ (नवीन शीतयुद्ध)

१९७९ मध्ये घडलेल्या दोन घटनांनी देतांतला

वेगळेच वळण दिले.

- इराणमध्ये क्रांती झाली आणि इराणच्या 'शाह'ची हकालपट्टी करण्यात आली. क्रांतिकारी इस्लामी नेता आयातोल्ला खोमेनी यांच्या नेतृत्वाखाली इराण इस्लामिक राज्य बनले. या नव्याने प्रस्थापित झालेल्या सरकारने अमेरिकेसोबत केलेले सर्व करार संपवले आणि शिवाय सेन्टो (CENTO) या लष्करी संघटनेमधून देखील बाहेर पडले.
- अफगाणिस्तानमध्ये, सोव्हिएट रशियाच्या मदतीने बाब्राक कारमाल यांनी राज्याचा प्रमुख म्हणून अफगाणिस्तानवर नियंत्रण मिळवले. अफगाणिस्तान हा समाजवादी देश म्हणून उदयाला आला ज्याचे सोव्हिएट रशियासोबत अतिशय घनिष्ठ लष्करी करार आहेत.

या घटनांमुळे देतांतचे पर्व संपुष्टात आले. त्यानंतर नव्याने सुरू झालेल्या युगाला 'नवीन शीतयुद्ध' असे संबोधले गेले; कारण शीतयुद्धाच्या काळात अमेरिका व सोव्हिएट रशियामध्ये असलेले तणाव पुन्हा निर्माण झाले.

**कालखंड १९८५ ते १९९१ (गोर्बाचेव्ह यांचे युग)**

या टप्प्यात सोव्हिएट रशियाच्या धोरणात काही महत्वाचे बदल पाहायला मिळतात. सोव्हिएट रशियाचे नवीन नेते मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी देशाच्या धोरणात काही महत्वपूर्ण बदल केले. त्यांच्या पेरेस्त्रॉइका व ग्लासनोस्त या संकल्पनांमुळे व परराष्ट्र धोरणाच्या नवीन दृष्टीमुळे सोव्हिएट रशियाचा दृष्टिकोन बदलला. गोर्बाचेव्ह यांच्या नव्या परराष्ट्र धोरणाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

(i) चीनसोबत संवाद (ii) शस्त्रनियंत्रण व निःशस्त्रीकरणावर लक्ष केंद्रित (iii) अफगाणिस्तानातून माघार (iv) भारतासोबतचे संबंध सुधारणे.

**माहीत आहे का तुम्हांला?**

पेरेस्त्रॉइका म्हणजे पुनर्रचना. सोव्हिएट रशियाच्या प्रस्थापित राजकीय व आर्थिक व्यवस्थेची पुनर्रचना करणे. मुक्त निवडणुकांसारख्या लोकशाही पद्धतींची ओळख आणि सोव्हिएट रशियाच्या साम्यवादी पक्षाची मक्तेदारी संपुष्टात आणणे म्हणजे राजकीय बदल होय. आर्थिक बदल म्हणजे सोव्हिएट रशियाच्या अर्थव्यवस्थेवर असणारे केंद्राचे नियंत्रण संपवणे. अर्थव्यवस्थेचे विकेंद्रीकरण करणे. ग्लासनोस्त म्हणजे खुलेपणा. यामुळे सोव्हिएट रशियामधील लोकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळाले. लेखक आणि पत्रकारांना आता शासनाच्या धोरणांवर टीका करता येणार होती.

गोर्बाचेव्ह यांच्या नव्या धोरणाचा परिणाम देशाच्या अंतर्गत राजकारणात पाहायला मिळाला. लोकांना सरकारच्या धोरणांवर टीका करण्याचा अधिकार मिळाला होता. सोव्हिएट रशियाच्या साम्यवादी पक्षाचे नियंत्रण संपुष्टात आले.



मिखाईल गोर्बाचेव्ह : सोव्हिएट कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव आणि सोव्हिएट रशियाचे अध्यक्ष

याच काळात पूर्व युरोपात काही महत्वाचे बदल झालेले दिसून येतात. सोव्हिएट रशियाच्या बदललेल्या धोरणांचा परिणाम पूर्व युरोपातील

देशांच्या राजकारणावर झाला. लोक अधिक राजकीय स्वातंत्र्याची मागणी करू लागले. १९८९ मध्ये पूर्व युरोपातील साम्यवादी सरकारांविरोधात जनउठाव करण्यात आले. पूर्व युरोपात झालेल्या या क्रांतीमुळे पोलंड, चेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, रूमानिया, पूर्व जर्मनी आणि बल्गेरिया येथील साम्यवादी पक्षाची सत्ता संपुष्टात आली. नंतर या देशांमध्ये लोकशाही शासनपद्धती अस्तित्वात आली.

पूर्व युरोपातील बदलाचे वारे सोव्हिएट रशियामध्ये देखील शिरले. २५ डिसेंबर १९९१ रोजी गोर्बाचेव्ह यांनी सोव्हिएट रशियाचे अध्यक्ष म्हणून राजीनामा दिला. दुसऱ्या दिवशी 'सुप्रीम सोव्हिएत'ने (सोव्हिएट संसद) मतदानामार्फत सोव्हिएट रशियाचे देश म्हणून असणारे अस्तित्व संपवले. सोव्हिएट रशियाचे विघटन झाले आणि नवीन देश अस्तित्वात आले.

**शोधा पाहू?**

सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर निर्माण झालेल्या देशांची नावे शोधून यादी तयार करा.

जर्मनी हे एक राष्ट्र म्हणून निर्माण व्हावे यासाठी १९९० मध्ये पूर्व व पश्चिम जर्मनीचे एकत्रीकरण झाले. चेकोस्लोव्हाकियाचे मात्र दोन देशांत विभाजन करण्यात आले : स्लोवाकिया आणि चेक रिपब्लिक. युगोस्लाव्हियाचे देखील सर्बिया, क्रोएशिया, बोस्निया आणि हर्झेगोविना, मॅसेडोनिया, स्लोवेनिया, कोसोओ आणि माँटेनिग्रो या देशांमध्ये विभाजन झाले. यामुळे आपल्याला आता युरोपमध्ये आणि पूर्वाश्रमीच्या सोव्हिएट रशियाच्या भागात अनेक नवीन देश पाहायला मिळतात.

शीतयुद्ध म्हणजे अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यातील संघर्षाची स्थिती होय. सोव्हिएट रशियाच्या विघटनामुळे शीतयुद्धाचे पर्व संपले. १९९१ नंतरच्या जगाचे वर्णन करताना दोन नवीन शब्दप्रयोग वापरले गेले. 'सोव्हिएट रशियानंतरचे युग' आणि 'शीतयुद्धोत्तर युग'. या नवीन पर्वात चीन आणि भारत, ब्राझील, दक्षिण आफ्रिका यांसारख्या देशांचा उदय झालेला पाहायला मिळाला. जागतिक व्यापार संघटना (WTO), G-20, ब्रिक्स (BRICS - ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका) यांसारख्या संघटना जागतिक घडामोडींमध्ये महत्त्वाची भूमिका वठवू लागल्या.

हे व यांसारखे इतर बदल आपण पुढील इयत्तेत अभ्यासणार आहोत.


**स्वतंत्र राष्ट्राचे राष्ट्रकुल (Commonwealth of Independent States-CIS)(1991)**

१९९१ मध्ये सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर याची निर्मिती करण्यात आली होती. सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर स्वतंत्र झालेले देश CIS चे सदस्य आहेत.


संस्थापक सदस्य : रशिया, युक्रेन आणि बेलारुस

त्यानंतरचे सहभागी झालेले सदस्य : आर्मेनिया, अँझरबैजन, जॉर्जिया, कझाकस्तान, किरगिझस्तान, मॉल्डोव्हा, ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान, उझबेकिस्तान.

कार्य : बहुपक्षीय व आंतरराज्यीय स्तरावरून समान हिताच्या घडामोडींकडे पाहिले जाते. लष्कर, परराष्ट्रसंबंध आणि आर्थिक सहकार्याबाबतीत संरचना पुरवण्याचे काम केले जाते.




सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतरचे देश




आजचा पूर्व युरोप

**Please see the following websites for further information:**

(1) History and Evolution of Non-Aligned Movement, Ministry of External Affairs, Government of India, August 22, 2012
https://mea.gov.in/in-focus-article.htm?20349/History+and+Evolution+of+NonAligned+Movement

(2) India and United Nations Peacekeeping Operations January 26, 2014 By Lt Gen Satish Nambiar (Retd) Ministry of External Affairs, Government of India
https://mea.gov.in/articles-in-indian-media.htm?dtl/22776/India+and+United+Nations+Peacekeeping+Operations



# स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. १९६२ मध्ये .......... क्षेपणास्त्र पेचप्रसंग उदभवला.
(अमेरिका, क्युबा, रशिया, चीन)

२. अरब इस्राएल वाद सोडवण्यासाठी अमेरिकेने १९७८ मध्ये ........... येथे परिषद आयोजित केली.
(कॅम्प डेव्हिड, हेल्सिंकी, पॅरिस, जिनीव्हा)

**(ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.**


(i) इराण – आयातोल्ला खोमेनी
(ii) अफगाणिस्तान – बाब्राक कारमाल
(iii) सोव्हिएट रशिया – रिचर्ड निक्सन

**(क) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा**

१. जहाजांना बंदरात अथवा देशात प्रवेश करण्यास रोखणे –

२. सोव्हिएट रशियाच्या प्रस्थापित राजकीय व आर्थिक व्यवस्थेची पुनर्रचना –

**प्र.२ (अ) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**(ब) आजचा पूर्व युरोप या नकाशाचे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतरच्या कोणत्याही चार देशांची नावे लिहा.

२. हंगेरीच्या शेजारील दोन राष्ट्रांची नावे लिहा.

**प्र.३ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

१. अलिप्ततावादी देशांनी नाफ्टाची (NAFTA) मागणी केली.

२. पं.जवाहरलाल नेहरू हे आसियान चे संस्थापक होते.

**प्र.४ सहसंबंध स्पष्ट करा.**

शीतयुद्ध आणि अलिप्ततावादी चळवळ

**प्र.५ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. नवीन शीतयुद्धाची संकल्पना स्पष्ट करा.

२. व्यापारगट म्हणजे काय?

**प्र.६ आपले मत नोंदवा.**

शीतयुद्ध काळात भारताने महत्त्वाची भूमिका बजावली.

**प्र.७ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

देतांत पर्व विशद करा.
(अ) अर्थ (ब) तणाव कमी करण्यासाठी महासत्तांनी केलेले प्रयत्न

**उपक्रम**

सार्कच्या सर्व शिखर परिषदांची यादी तयार करा.

***